Public Affairs Office
U.S. Consulate General, Mumbai

PRESS RELEASE

AMERICAN CENTER, 4 New Marine Lines, Mumbai 400 020
Tel: 91-22-2262-4590 Fax: 91-22-2262-6800
E-mail: MumbaiPublicAffairs@state.gov Web: http://mumbai.usconsulate.gov

July 7, 2010

पुण्यात अमेरिकन सेंटर रोड शोचा शुभारंभ
अमेरिकी संस्कृतीचा चार-दिवसीय मेळा सर्वांना खुला आणि मोफत

५४९९९ नंबरवर "JoinUS PUNE" टाइप करून एसएमएसद्वारे अधिक माहिती मिळवा; http://mumbai.usconsulate.gov/ आणि www.facebook.com/amcentermumbai या संकेत स्थळांवर रोड शोबद्दल विस्ताराने जाणून घ्या

जुलै ७, २०१०, पुणे -- विक्रमी खपाच्या तीन अमेरिकी `बेस्ट-सेलर' पुस्तकांच्या मराठी अनुवादांचे प्रकाशन अमेरिकन सेंटरच्या संचालिका लिन गॅडकाउस्कीयांनी अमेरिकन रोड शोच्या पहिल्या दिवशी पुण्यातील मराठवाडा मित्रमंडळ कॉलेज ऑफ कॉमर्सयेथे केले. एलीझाबेथ गिल्बर्ट यांचे "ईट, प्रे, लव..." आणि "कमिटेड", त्याचबरोबर झुम्पा लाहिरीयांचे "अनअकसटम्ड अर्थ" या तीन इंग्रजी पुस्तकांचे प्रकाशन अमेय प्रकाशनाने केले आहे.

अमेरिकन सेंटरचा रोड शो अमेरिकी संस्कृती, कला, समाज, मूल्य आणि विचारांचे दर्शन आहे. एक हजाराहून अधिक अमेरिकन लाइब्ररीची पुस्तकं, नियतकालिकं, पोस्टर, व्हीडीओ यांचा समावेश रोड शोमध्ये असेल. मराठवाडा मित्रमंडळ कॉलेजमध्ये अधिकांश कार्यक्रम होतील. पुस्तकांचे प्रदर्शन दहा ते पाच दरम्यान खुले असेल आणि ७ ते ९ जुलै दररोज पाच वाजता एक नावाजलेला अमेरिकी सिनेमा दाखवला जाईल. पर्यावरण, अमेरिकी कायदा आणि अमेरिकी उच्च शिक्षणासारख्या विविध विषयांवर बोलणाऱ्या अमेरिकी वक्त्यांशी पुणेकरांना संवाद साधता येईल.

चार दिवसाच्या ह्या अत्यंत व्यस्त आणि उत्साहवर्धक सांस्कृतिक कार्यक्रमांची माहिती देताना लिन गॅडकाउस्की म्हणाल्या की, " पुणेकरांबरोबर ही देवाण घेवाण करताना अमेरिकी वकिलातीला विशेष आनंद होत आहे. गेली अनेक वर्षे हे फलदायी संबंधाचं पर्व चालु आहे. हा रोड शो भारतीय आणि अमेरिकी लोकांमधल्या बहरणा-या संबंधाचं प्रतिबिंब आहे. हे संबंध दोन्ही देशातील व्यूहात्मक भागीदारीचा हिस्सा आहेत." त्या हे देखील म्हणाल्या की अमेरिकी साहित्याचे मराठीत प्रकाशन स्वागतार्ह आहे. अमेरिकी विचार आणि लेखन भारतातल्या चौथ्या सर्वात जास्त बोलल्या जाणा-या भाषेत आल्यामुळे अधिक मराठी लोकांपर्यंत पोहोचेल. विशेषकरुन मराठीचे अमेरिकेत सुद्धा अस्तित्व आहेच.

" जशी सत्तेचा वर्तुळात दोन राष्ट्र सहकार्य करतात आणि आंतरराष्ट्रीय कूटनीती प्रमाणे वाटाघाटी करतात, त्याच प्रकारे दोन देश शैक्षणिक आणि सांस्कृतिक देवाण घेवाणीतून जवळ येतात. आपण एकामेकांचे दृष्टीकोन अनुवादित

साहित्यातून अधिक गहिरे करत असतो. आणि त्याचमुळे मराठी पुस्तकांचे प्रकाशन हे भारतीय-अमेरिकन भागीदारीचा महत्वाचा पैलू आहे. हे लक्षात घेतलं पाहिजे की दोन्हीं देश ऐकामेकांचे विचार समजू-उमजू आणि स्वीकारु लागले आहेत."

अनुवादित पुस्तकांचे प्रकाशक उल्हास लाटकर ह्यांनी गॅडकाउस्की ह्यांच्या अनुवादांबाबतच्या आशावादाला दुजोरा दिला. "अनुवादासाठी ही पुस्तकं निवडली गेली कारण ती मुळात मानवी आहेत आणि म्हणून ती अमेरिकेच्या भूगोलापलीकडे जातात. ही पुस्तकं आपल्याला सांगतात की अमेरिकी आणि भारतीयच नव्हे तर जगातील वेगवेगळ्या रंगांची आणि देशांची लोकं समानतेच्या धाग्याने बांधली गेली आहेत. आणि त्यामुळे हे अनुवाद लोकांना आपलेसे वाटतील."

ह्या चार दिवसाच्या रोड शोमध्ये `अमेरिकन कॅम्पस लाईफ' आणि उच्च शिक्षणामधील संधी ह्याबाबत चर्चा आणि परिसंवाद देखील आयोजित केले गेले आहेत. पहिल्या दिवशी अमेरिकेतील अंडरग्रॅजुएट विद्यार्थींनी समान्था हिक्स ही एमएमसीसी महाविद्यालयात(दोन वाजता) आणि त्यानंतर गरवारे महाविद्यालयात (चार वाजता) तिच्या अनुभवांवर बोलली. इंटरनेट स्वातंत्र्यावरसुद्धा सिम्बायॉसिस स्कुल मध्ये खुली चर्चा पार पडली. अमेरिकन सेंटरच्या संचालिका लिन गॅडकाउस्की ह्यांनी ' युऐस इंडिया ग्रीन पार्टनरशीप' ह्याबाबत एमएमसीसी इथे संवाद साधला. तिथे मुलांसाठीचा 'डम्बो' हा चित्रपट दाखवण्यात आला.

जुलै ८ तारखेला एरिक जेकब्स अमेरिकी उच्च शिक्षण आणि व्हिसा या विषयावर सकाळी दहा वाजता पुणे विद्यापीठात आणि दुपारी १२ वाजता सिम्बिओसीस सेंटर फॉर इंटरनेशनल एजूकेशन येथे बोलतील. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये अमेरिकन सेंटरचे माध्यम अधिकारी, केतन वैद्य आणि सुमेधा रायकर-म्हात्रे, राष्ट्राध्यक्ष बराक ओबामायांच्या "ड्रिम्झ फ्रॉम माय फादर" या पुस्तकातील निवडक उतार्‍यांचे अभिवाचन करतील. "डेथ ऑफ अ सेल्समन" या जगप्रसिद्ध नाटकाचे अभिवाचन पद्मनाभ बिंड आणि मंडळी सुदर्शन रंगमंचयेथे करतील.

मुंबईस्थित अमेरिकी वकिलातीच्या पब्लिक अफेर्स सेक्शन तर्फे हा रोड शो आयोजिला केला गेला आहे. रोड शोच्या अधिक माहितीसाठी आपण http://mumbai.usconsulate.gov/
आणि www.facebook.com/amcentermumbai या संकेत स्थळांवर विस्ताराने जाणून घेऊ शकता. अथवा सुमेधा रायकर-म्हात्रे यांना ९८७०१०१६४३ नंबरवर आणि raikars @state .gov संपर्क करू शकता.